International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 4 March-April 2024

# संविधान शिल्पकारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर

**ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
संशोधक विद्यार्थिनी, (BSc, MA. , NET)
**Corresponding Author:** **ऐश्वर्या नामदेव बल्लाळ**
**Email:** aishwaryaballal18@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.14196311**

**प्रस्तावना:**

दलितांना प्रकाशाचा मार्ग दाखवणारे स्वातंत्र्यसूर्य, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री,. भारतीय संविधानाचे शिल्पकार, प्रख्यात कायदेपंडीत, अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक आणि राजकीय नेते म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर होय. यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ मध्ये महु येथे झाला. त्यांचे मुळ नाव भीमराव रामजी सपकाळ व मूळ गाव आंबवडे (रत्नागिरी) होते. डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे कार्य फक्त संविधानापुरते मर्यादित नाही तर त्यांचे कार्य विविध क्षेत्रात विस्तारलेले आहे. दलितांना समाजात स्थान मिळवण्यासाठी केलेली सुरुवात भारत भारताच्या पहिल्या कायदा मंत्र्यापर्यंत पोहोचली. ते ब्रिटीश भारतातील मजूरमंत्री होते. त्यांनी भारतात बौद्ध धर्माला पुर्नजीवित केले. देशाच्या आतापर्यंतच्या सुव्यवस्थेला आंबेडकरच जबाबदार आहेत. त्यांनी आधुनिक तत्वे वापरुन भारताची राज्यघटना तयार केली. म्हणूनच त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार म्हणतात. सुरुवातीचे प्राथमिक शिक्षण त्यांनी रत्नागिरीत पूर्ण केले. ते माध्यमिक शिक्षणासाठी साताऱ्याला गेले. त्यानंतर त्यांचा परिवार मुंबईत स्थायिक झाला. तेथील एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये जाण्याचा त्यांनी प्रयत्न केला, पण अस्पृश्य म्हणून त्यांना नाकारले. पण त्यांच्या वडिलांनी आपल्या लष्करातील पदाचा वापर करुन प्रवेश मिळण्यास भाग पाडले. एल्फिन्स्टन हायस्कूल, मुंबई येथे शिक्षण घेणारे ते पहिले अस्पृश्य होते. १९०८ मध्ये त्यांचा विवाह दापोलीतील भिकू वलंगकर यांची कन्या रमाबाई यांच्याशी झाला. पण १९३५ मध्ये त्यांचे निधन आले. १९४८ मध्ये डॉ.शारदा कबीर यांच्याशी द्वितीय विवाह केला. लग्नानंतर त्यांचे नाव सविताबाई आंबेडकर ठेवले. अस्पृश्य जातींना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक संकटे पार केली. सनातन्यांच्या रोषाला सामोरे जावे लागले. तरीही ते डगमगले नाहीत. संधी मिळेल तिथे आणि पैसे हाती लागतील तसे त्यांनी शिक्षण घेतले. जातीसंस्थेवर परखडपणे बोलणारे व त्यांना उद्बोधन देऊन त्यांना जागे करणारे आंबेडकर प्रथमच होते. त्यांचे योगदान फक्त जातीपातीवर नाही तर, अखंड भारतासाठी आहे. त्यांनी संशोधन करून अभ्यास करून तयार केलेल्या राज्यघटनेमुळे आपण आज लोकशाही स्वातंत्र्याचा आस्वाद घेत आहोत.

**उदिष्ट्ये:**

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जातीविरोधी चळवळ जाणून घेणे.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राज्यघटनेतील योगदान स्पष्ट करणे.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रेरणादायी प्रवास समजून घेणे:
४. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची ग्रंथसंपदा व मासिके यांची माहिती घेणे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण:-**

१९०७ मध्ये आंबेडकर मॅट्रिक पास झाले आणि ते पास होणारे पहिले अस्पृश्य जातीतील भारतीय होते. यानंतर त्यांना बडोदा संस्थानाचे राजे सयाजीराव गायकवाड यांनी २५ रु. ची शिष्यवृत्ती सुरु केली. १९०८ मध्ये त्यांनी B.A. साठी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयात पदवी संपादन केली. पुढे त्यांना अमेरिकेत उच्च शिक्षण घेण्यासाठी सयाजीराव गायकवाड यांनी मदत केली व १९१३ ला त्यांनी अमेरिकेत प्रस्थान केले. न्युयॉर्क येथील कोलंबिया विद्यापीठात राज्यशास्त्र शाखेत त्यांनी प्रवेश घेतला. १९१५ मध्ये त्यांचे M.A. चे शिक्षण पूर्ण झाले. १९१६ मध्ये त्यांनी 'द नॅशनल डिव्हीडंट ऑफ इंडिया: अ हिस्टॉरिकल अॅन्ड अॅनालिटिकल स्टडी' हा प्रबंध वाचला. कोलंबिया विद्यापीठात सादर केला व त्यांना Ph.D. पदवी मिळाली. पुढे लंडन स्कुल मॉफ इकॉनॉमिक्स अॅण्ड पॉलिटिकल सायन्स मध्ये प्रवेश घेतला. येथे M.Sc. पदवी मिळाली. १९२२ मध्ये लंडनच्या ग्रेट इन या संस्थेच्या न्याय सभेकडून बार-एट लॉ पदवी मिळाली. १९२३ मध्ये 'द प्रोब्लेम ऑफ रुपी' या प्रबंधासाठी लंडन विद्यापीठगने D.Sc. पदवी व अशी पदवी मिळवणारे ते पहिले भारतीय होते. पुढे १९५२ मध्ये कोलंबिया विद्यापीठातर्फे आंबेडकरांना डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी प्रदान केली. ही पदवी मिळणारे ते पहिले भारतीय होते. १९५३ मध्ये उस्मानिया विदयापीठाने डी.लिट. पदवी दिली. आंबेडकर हे त्याकाळातील भारतातील सर्वात प्रतिभाशाली व उच्च शिक्षित व्यक्ती होते.

**आंबेडकरांचो अस्पृश्यता निर्मूलन व जातिसंस्थेविरुद्ध लढा :**

आंबेडकरांना बालपणापासूनच जातिमुळे अस्पृश्येचा सामना करावा लागला. एका प्राण्याला वागवणूक दयावी तशी त्यांच्या समाजाला वागणूक होती तेव्हापासूनच अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य त्यांनी सुरु केले. आपल्यावर अन्याय होतोय आणि त्याला विरोध केला पाहिजे हे लोकांना पहिल्यांदा कोणीतरी पटवून दिले. लोकांना संघटित केले, प्रचार सभा यातून त्यांना संघर्ष करण्याचे धडे दिले.

**मतदानाचा हक्क :**

भारतीय समाजातील कोणत्या लोकांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी ब्रिटीश सरकारने १९१९ मध्ये साऊथबरो कमिटी स्थापन केली. त्यावेळी अस्पृश्यांच्या मतदानाबाबत अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून आंबेडकर यांनी साक्ष दिली. तेव्हा त्यांनी अस्पृश्यांना मतदानाचा हक्क मिळालाच पाहिजे, त्यांना निवडणुकीस उभे राहता आले पाहिजे त्यासाठी त्यांना स्वतंत्र मतदारसंघ हवेत. या मतदारसंघात लोकसंख्येनुसार समान जागा पाहिजेत अशा मागण्या केल्या.

**महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गांची परिषद :**

१९२० मध्ये दक्षिण महाराष्ट्रातील पहिली बहिष्कृत वर्गाची परिषद झाली. या परिषदेचे अध्यक्ष आंबेडकर होते. शाहू महाराजांची विशेष उपस्थित होती, अध्यक्षीय भाषणात बोलताना त्यांनी अस्पृश्यांच्या सामाजिक व राजकीय हक्कांचे समर्थन केले, अस्पृश्यांच्या उध्दारावर भाष्य केले. त्यावर शाहू महाराजांनी त्यांचा गौरव केला. "आंबेडकरांच्या रुपाने तुम्हाला तुमचा उध्दारकर्ता लाभला आहे." असे शब्दगौरव उद्गारले त्यांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्य समाजाने आपला उध्दार करावा असे सांगितले. ते फक्त अस्पृश्यांचेच नव्हे तर देशाचे थोर नेते होतील हे महाराजांनी हेरले होते.

याच्यानंतर १९२० मध्ये नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृत सभा झाली. त्यावेळी अध्यक्ष शाहू महाराज होते व विशेष उपस्थित आंबेडकर होते. त्यावेळी आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या मताधिकाराचा मुद्धा उचलून धरला. त्याचबरोबर अस्पृश्यांचे सामाजिक व राजकीय हक्क विस्तारीत केले. इंग्रज सरकारने अस्पृश्यांना कोणाऱ्या मर्जीवर अवलंबून न राहता स्वतंत्र सामाजिक व राजकीय हक्क द्यावेत असे मत मांडले.

**महाड सत्याग्रह:**

सवर्ण, उच्चधर्मीय, उच्चजातीय लोकांकडून अस्पृश्य जातीतील लोकांना केला जाणारा द्वेष, दुजाभाव, अत्याचार आंबेडकरांना मोडीत काढायचा होता. त्यासाठी त्यांनी १९२७ मध्ये चवदार तळयाचा सत्याग्रह केला. स्पृश्य लोकांच्या भीतीने महाडच्या अस्पृश्यांनी तलावाचे पाणी पिण्याचे धाडस केले नाही. त्यामुळे आंबेडकरांनी बहिष्कृत हितकारणी सभेतर्फे महाड येथील चवदार तळयाचे पाणी प्राषन करुन सत्याग्रह केला. तेव्हा त्यांनी लोकांना उद्देशून म्हटलं होतं,"चवदार तळयाचे पाणी प्यायल्याने तुम्ही आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही, आजपावेतो चवदार तळयाचे पाणी प्यायलो नव्हतो तरी तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळयावर जावयाचे ते केवळ तळयाचे पाणी पिण्याकरीता नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळयावर आपल्याला जावयाचे आहे."

**मनुस्मृती दहन :**

शुद्र जातींचा उपमर्द करणारी, त्यांची प्रगती खुंटवणारी, त्यांचे आत्मबळ नष्ट करणारी, त्यांची सामाजिक, राजकीय व आर्थिक गुलामगिरी कायम करणारी मनुस्मृती २५ डिसेंबर १९२७ रोजी दहन केली. मनुस्मृती जाळताना आंबेडकरांनी स्पष्ट केले होते की, "आम्ही मनुस्मृती नावाचे फक्त पुस्तक जाळले नाही तर त्याचा अर्थ असा होतो की मनुस्मृतीने लोकांच्या मनात भरलेली विषमता जाळली. मनुस्मृतीने लोकांच्या मनावर उच्चनीचतेचे संस्कार केलेले आहेत आणि यापासून लोकांना मुक्तच होता येत नाहीय. लोकांना समता ही गोष्ट अस्तित्वात आहे असे वाटतच नाही. म्हणूनच मनुस्मृती जाळणे म्हणजे लोकांची ही समजूत जाळणे होय.

**काळाराम मंदिर सत्याग्रह:**

आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली २ मार्च १९३० रोजी नाशिक शहरातील काळाराम मंदिरामध्ये अस्पृश्यांच्या प्रवेशासाठीचा सत्याग्रह होता. रामाच्या ऐतिहासिक अशा या मंदिरात व रामकुंडात स्थान केल्यास पावित्र्य मिळते अशी श्रध्दा होती. पण अस्पृश्यांना या ठिकाणी जाण्यास मनाई होती. म्हणूनच आंबेडकरांनी काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन करण्याचे ठरवले. पण पुजाऱ्यांनी प्रवेश देण्यास नकार दिला व दरवाजे बंद केले. याकाळात प्रचंड दंगली, हाणामारी, दगडफेक झाली. प्रचंड तीव्र विरोध झाला. हा लढा ५ वर्षे अखंड चालला व अस्पृश्यांना यश आले. आंबेडकरांच्या नेतृत्वाने अखेर प्रवेश मान्यता मिळाली.

**आंबेडकरांचे इतर समाजसुधारक कार्य:**

आंबेडकरांना अनिष्ट प्रथा, रुढी झुगारुन समाजात समता प्रस्थापित करायची होती. त्यासाठी त्यांनी अखंड लढे दिले. त्यांनी प्रत्येक कार्यात सहभाग घेतला. शिवजयंती व गणेशोत्सवात सहभाग घेवून शिवाजी महाराजांचे कर्तुत्व लोकांना सांगितले. समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी १९२७ मध्ये समाज समता संघ स्थापन केला. मंदिर प्रवेशासाठी अंबादेवी मंदिर सत्याग्रह, पर्वती मंदिर सत्याग्रह केले, शेतीविषयी विचार मांडले. पाण्यासाठी त्यांनी 'दामोदर खोरे योजना' आखली. खोती पध्दत बंद केली. स्त्रियांच्या हक्कासाठी लढा दिला.

**आंबेडकरांचे संविधान निर्मितीतील योगदान:**

आंबेडकरांना मसुदा समितीचे अध्यक्ष करुन संविधान निर्मितीची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली होती. आंबेडकरांना कायदयाचे व राज्यघटने सखोल ज्ञान होते. त्यांनी सुमारे ६० देशांच्या राज्यघटनेचा सखोल अभ्यास केला. याचबरोबर कायदेविषयक ग्रंथ, बौद्ध ग्रंथाचेही अध्ययन केले. अवघ्या १४५ दिवसांत आंबेडकरांनी राज्यघटनेचा मसुदा तयार केला. यावेळी त्यांना मधुमेहाचा

आजार होता. तरी त्यांनी आपला पूर्ण विचार, घटना तयार करण्याकडे दिला. मसुद्यावर विविध चर्चा, दुरुस्त्या होऊन संपूर्ण घटना तयार केली. २ वर्षे ११ महिने १८ दिवस यासाठी लागले. आंबेडकरांनी अहोरात्र यासाठी मेहनत घेतली. म्हणूनच त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात.

**आंबेडकरांची ग्रंथसंपदा व मासिके/वृत्तपत्रे :**

**वृत्तपत्रे:**

मुकनायक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुद्ध भारत,

**ग्रंथ:**

ईस्ट इंडिया कंपनी प्रशासक आणि अर्थनीती, भारतातील जातिसंस्था - तिची यंत्रणा उत्पत्ती आणि विकास, ब्रिटीश भारतातील प्रांतिक वित्ताची उत्क्रांती, संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य, उपयाचा प्रश्न, उद्गम आणि उपाय: पाकिस्तान अथवा भारताची फाळणी, जातीचे निर्मुलन, रानडे - गांधी आणि जिन्हा, गांधी आणि अस्पृश्यांची मुक्ती, जातीय पेच आणि तो सोडवण्याचा मार्ग, काँग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले, महाराष्ट्र एक भाषिक प्रांत, हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती; शुद्र पूर्वी कोण होते?, हिंदू धर्मातील कोडे, भाषिक राज्यांसंबंधी विचार, क्रांती आणि प्रतिक्रांती, बौद्धधम्म आणि साम्यवाह, भगवान बुद्ध त्यांचा धम्म.

**आंबेडकरांचे गुरु :**

१. गौतम बुध्द
२. संत कबीर
३. महात्मा फुले

**मुल्यमापन :**

भीमराव रावजी आंबेडकर तथा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ज्ञानाच्या विविध शाखांमध्ये योगदान आहे. आंबेडकरांनी समाजा मध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण करुन दिली. त्यांच्यामध्ये लढाऊवृत्ती निर्माण करून समाजाला त्यांचे हक्क मिळवून दिले. त्यांनी सामाजिक क्रांतीच्या चळवळीला प्रेरणा दिली. महिलांच्या व कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते स्वातंत्र्यपूर्व भारताचे मजूरमंत्री, तर स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री होते. त्यांचे योगदान विविध कार्यात अतुलनीय आहे. भारतीय संविधानात मोलाचे योगदान देऊन संपूर्ण देशासाठी एक आदर्श घटना निर्माण केली आहे. म्हणूनच त्यांना भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणतात.

महाड सत्याग्रह, मनुस्मृती दहन, मंदिर सत्याग्रह, पुणे करार, गोलमेज परिषदा, स्वतंत्र मजूर पक्ष, बहिष्कृत हितकारिणी सभा, विविध वृत्तपत्रे, पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना, स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने कार्य, शेतकऱ्यांसाठी कार्य अशा अनेक महत्वपूर्ण गोष्टी आंबेडकरांनी आपल्या जीवनात केल्या. त्यामुळे भारतीय समाजरचनेला वेगळी दिशा निर्माण झाली. समाजातील तळागाळातील व्यक्तींचा प्रामुख्याने विचार केला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा प्रेरणादायी संदेश दिला. त्यांना वाचनाची आवड व शिक्षणाचे मुल्य होते. वेळ व पैसा कमी असल्यामुळे त्यांनी एका दोन-तीन पदव्या घेतल्या. त्यांच्या इतके विद्याविभूषीत आजतागायत कोणी नव्हते. त्यांनी त्यांचे संपुर्ण आयुष्य समाज सेवेसाठी अर्पण केले. जर तुमच्याकडे दोन रुपये असतील तर एक रुपयाचे पुस्तक घ्या व एक उपयाची भाकरी घ्या, भाकरी तुम्हाला जगवेल तर, पुस्तक तुम्हाला कसे जगायचे शिकवेल, हे त्यांचे विचार आजही दिशादर्शक आहे. आंबेडकरांचे विचार आजही समाजाला गरजेचे आहेत: त्यांचे विचार व त्यांचा संघर्षमय प्रेरणादायी प्रवास प्रत्येकापर्यंत पोहोचावा म्हणून हा शोधनिबंध. अशा या लढवय्या नेत्याचे महापरिनिर्वाण ६ डिसेंबर १९५६ रोजी झाले व भारत अशा या महापुरुषापासुन पोरका झाला.

**संदर्भ ग्रंथ :**

1. कीर धनंजय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
2. आंबेडकर बाबासाहेब, माझी आत्मकथा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
3. भगत दत्ता, समतासंगराचा महानायक कालपटावर, डॉ बाबासाहेब आंबेडकर, सायन प्रकाशन, पुणे.
4. थरूर शशी, आंबेडकर जीवन आणि वारसा, मधुश्री प्रकाशन, पुणे.
5. कठारे अनिल, महाराष्ट्राचा समग्र इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड.